जा.क्र.प्रा/प्राशि/मान्यता/[illegible]/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक : 13 AUG 1998

प्रति,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे

विषय : सन १९९७-९८ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.........

संदर्भ : शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-[illegible]/१०९७/[३६५] प्राशि-१ दिनांक - ११/८/९७

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याद्वारे कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, ९७ पासून इयत्ता १ली ते ४थी पर्यंत सन १९९७-९८ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु केलेल्या वर्गासह प्रत्येकी एक तुकडीस शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर / ~~[illegible]~~ "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात शासनाचे अनुदान [illegible] या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचे नांव	शाळेचे नांव व ठिकाण	इयत्ता	माध्यम
१]	**लालबहादूर शास्त्री मित्र मंडळ भोसरी**	**लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यामंदिर भोसरी पुणे ३९**	**१ ते ४ थी**	**मराठी**

२.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हताधारक आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेजवळ भौतिक सुविधा, व्यवस्थापन, शिक्षक सुविधा शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या [illegible] केला पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पद्धती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांची सुयोग्य अंमलबजावणी केली पाहिजे. त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत. [illegible]

२.६ संस्थेने शाळेत विद्यार्थ्यांना/[illegible] विहित [illegible] आणि [illegible] स्वरूपात [illegible] केल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील

...२/-

२

... [illegible] विनाअनुदान तत्वावर निर्णय करणे, तसेच [illegible] नियमितपणे आणि [illegible] उपस्थिती या गोष्टी त्यांच्याबाबत [illegible] आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, [illegible] [illegible] [illegible] कोणत्याही [illegible] करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपद्धतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

[१२६] ३०४०६ २.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी पुनर्नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिका-यांकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर पुनर्नूतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करुन घेऊन मगच संस्थेला शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळेसाठी [illegible] शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार [illegible] [illegible] [illegible] आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्यासंदर्भात प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित मुदतीत [illegible] अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो [illegible] यावा.]

७] [illegible] मान्यता नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१
13 AUG 1998
दिनांक

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. सं.

यांची सही आहे

13/8/98

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : प्रशासन अधिकारी / महानगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळ, — जिल्हा – —
यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : मा. सचिव,
मानवहक्कपुरस्कर्ती मित्र मंडळ, भोसरी, पुणे.
यांना माहितीसाठी अग्रेषित.